# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०८/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील उदासा ते डब्लु सी एल स्टेट हाय उमरेड येथे दिनांक ०५/०७/२२ चे २१.०० वा. ते २१.३० वा. सुमारास एमएच– ४९/बीडी– ४९१७ क्रमांकाच्या होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोपेड गाडीचा चालक रोहीत शरद शंभरकर(मृतक) वय २४ वर्ष रा. शांतीनगर गार्डन जवळ, नागपुर हा त्याचे मोपेड गाडीचे मागे प्रतीक्षा हरीचंद्र गायकवाड(मृतक), वय २२ वर्ष, रा. शांतीनगर गार्डन जवळ, नागपुर हिला बसुन नागपुर वरून उमरेड कडे स्टेट हायवे क्र ३५३ डी नागपुर ते उमरेड बाजुने जात असतांना मौजा उदासा ते डब्लु सी एल स्टेट हायवे रोडवर आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अचानक गाडी स्लीप झाल्याने तो गंभीर जखमी होउन स्वत: व मागे बसनारी कु प्रतिक्षा हिचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार भोजराज झाडे पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राजु डोर्लीकर मो.नं. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत मौजा दुधबर्डी येथे दिनांक ०७/०७/२२ चे १६.०० वा. सुमारास अज्ञात चारचाकी वाहनाचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नि  काळजीपणे चालवुन दुधबर्डी येथिल शेतातुन सावनेर कडे परत येत असलेली सौ. निर्मला चिरकुट खोडे(मृतक), वय ६० वर्ष, रा. पहलेपार सावनेर हिला मागुन धडक दिली. या अपघातात तिचे डोक्यावर व कमरेवर, दोन्ही पायावर मार लागुन गंभीर जखमी झाली. तिला उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन तिला मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामराव देवराव मोवाडे वय ५१ वर्ष, रा. वार्ड क्र. १६ पहलेपार सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४(ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनिल तिवारी मो.नं. ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ८ कि. मी. अंतरावरील मौजा मेंढला येथे दिनांक ०७/०७/२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— ईश्वर हरिभाउ अलोने, वय २५ वर्ष, रा. मेंढला ता. नरखेड जि. नागपूर यांची आजी नामे— देवकाबाई रामकृष्ण अलोने, वय ८० वर्ष, रा. मेंढला ता. नरखेड जि. नागपूर ही घरून गावातील हापसीवरती बकेट घेउन पाण्याकरिता गेली होती. त्यादरम्यान रोडच्या खालच्या भागाने पायी जात असता एम. एच—४०/बिएल—९४०६ क्रमांकाचा बोलेरो पिकअपचा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीची आजी देवकाबाई अलोने हिला धडक दिली. या अपघातात ती गंभीर जखमी झाल्याने तिला उपचाराकामी प्रथमिक आरोग्य केंद्र, मेंढला येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. तसेच आरोपीने तेथे उभी असलेल्या एमएच— ४०/ सिजी— ०१७५ क्रमांकाच्या मोटरसायकला धडक मारून अंदाजे २०,०००/— रूपयांचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ४२७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री मनोज शेंडे मो.क्र. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर** — दिनांक ०७/०७/२०२२ चे ११.०० वा. ते १५.०० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्यीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे— हर्ष खांबलकर रा. नरसाळा याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादव मो.क्र. ९१५६६६४४४४ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. भिवापुर**:— दिनांक ०७/०७/२०२२ चे ०९.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय २१ वर्ष ही आपले भाडयाचे रूम केलेल्या घरी हजर असता आरोपी नामे— राकेश रामाजी चहांदे, वय ३५ वर्ष, रा. नवरगाव ता. सिंदेवाही जि. चंद्रपुर हा तेथे आला व त्याने म्हटले की, 'तु माझ्या सोबत लग्न कर' असे म्हटले त्यावर फिर्यादीने 'मी लग्न करीत नाही तु येथून निघून जा' असे म्हटले तरी आरोपी हा वांरवार लग्न कर असे म्हणत होता. आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारून टाकन्याची धमकी दिली. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (आय), ४५२, ३२३, ५०४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मसफौ दुर्गा शंभरकर या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मालु पेपर मिल बोरूजवाडा सावनेर येथे **विनोद चरनदार पाटिल (मृतक), वय ३८ वर्ष, रा. भागेमाहेरी** हा मालु पेपर मिल युनिट क्र. ३ हेटी सुरला येथे नौकरीवर असुन दिनांक ०६/०७/२०२२ रोजी चे रात्री ११.०० वा. नाईट डयुटीवर गेला होता. दिनांक ०७/०७/२०२२ चे ०८.३० वा. सुमारास तो मालु पेपर मिल येथे शौचास गेला काही वेळानंतर तो परत न आल्याने त्याच कंपणीचे केमीकल ऑपरेटर यशवंत भागवत यांनी जावुन पाहीले असता तो शौचालयच्या बाहेर पडला होता. त्यास उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांपी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बबन चरणदार पाटिल, वय ४० वर्ष, रा. भागेमाहेरी वार्ड क्र ३, ता. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अनिल तिवारी मो.नं. ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत भिमानटोला शिवार येथे फिर्यादी याचा भाउ **लक्ष्मण गुलाब धुर्वे (मृतक), वय २८ वर्ष, रा. भिमानटोला** हा दि १५/०६/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. दरम्यान घरी कोणालाही काही न सांगता घरून निघुन गेला. त्याचा शोध घेतला असता मिळुन आला नाही. दि ०७/०७/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वा. दरम्यान भिमानटोला शिवारातील मॅगनीज खदानीजवळ चप्पल व बॅग दिसल्याने खदानीचे पाण्यात शोध घेतला असता यातील मृतक नामे लक्ष्मन गुलाब धुर्वे, रा. भिमानटोला याचे प्रेत मिळुन आले. सदर मृतक याने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून पाण्यात उडी घेवुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ईश्वरदयाल गुलाब धुर्वे, वय ३२ वर्ष, रा. भिमानटोला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा ओमप्रकाश काडवते मो. क्र.९५४५८४४७८८ हे करीत आहे.

३) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत भिमानटोला शिवार येथे फिर्यादी यांची पत्नी **मैनावती असुराज धुर्वे(मृतक), वय ३८ वर्ष, रा. भिमानटोला** हि दि. ०९/०६/२०२२ रोजी सकाळी १०:०० वा. सुमारास घरी कोणालाही काही न सांगता घरून निघुन गेली. तिचा शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. दिनांक ०६/०७/२०२२ रोजी सांयकाळी ०५.०० वा. दरम्यान भिमानटोला शिवारातील मॅगनीज खदानीजवळ चप्पल व बॅग दिसल्याने खदानीचे पाण्यात शोध घेतला असता यातील मृतक नामे मैनावती असुराज धुर्वे हिचे प्रेत मिळुन आले. सदर मृतक हिने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून पाण्यात उडी घेवुन अत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– असुराज श्यामराव धुर्वे, वय ४७ वर्ष, रा. भिमानटोला यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनी श्रीकान्त लांजेवार मो.नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा सावली येथे मृतक याने दिनांक ०२/०७/२०२२ रोजी सकाळी ०५.३० वा. सुमारास **राजकुमार हरीचंद्र मेश्राम वय २५ वर्ष रा. सावली ता. कळमेश्वर जि. नागपुर** याने आपले राहते अज्ञात कारणातुन किटकनाशक विषारी औषध घेतल्याने घराबाहेर पडुन दिसला. त्याला उपचाराकामी प्रथम नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यास तपासुन दि. ०५/०७/२०२२ चे १२.२० वा. मृत घोषीत केले. मर्ग चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे मपोहवा नलिनी उईके पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार उईके हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**